दिवाणी किरकोळ अर्ज क्र.86/2022
महादु काशिनाथ चव्हाण वि. कोणीही नाही.
**CNR : MHJG070007412022**

## निशाणी क्र.1 खाली आदेश

अर्जदार यांनी सदरचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदा 1827 मधील तरतुदीप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी दाखल केला आहे.

2. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र.1 व 2 हे सख्खे भाउ असून अर्जदारांचे वडिल कै.काशिनाथ सोभा चव्हाण हे दिनांक 19/03/2021 रोजी मौजे.वडगांव नालबंदी ता.भडगांव, जि.जळगांव येथे मयत झालेले आहेत. मयत काशिनाथ सोभा चव्हाण यांच्या आई नामे भिलीबाई सोभा चव्हाण हया 40 वर्षापुर्वी मयत झाल्या असून वडिल नामे सोभा जेसु चव्हाण हे देखील 50 वर्षापुर्वी मयत झाले आहेत.

3. तसेच मयत काशिनाथ सोभा चव्हाण यांच्या पत्नी संत्रीबाई काशिनाथ चव्हाण हया दिनांक 15/11/2019 रोजी मयत झाल्या आहेत. त्यामुळे मयत काशिनाथ सोभा चव्हाण यांना अर्जदारांव्यतिरीक्त अन्य कोणीही वारस नाहीत. म्हणुन अर्जदार हे मयतांचे कायदेशिर वारस असल्याने सदर वारस जाहिर होवुन मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी दाखल केलेला आहे.

4. मयत काशिनाथ सोभा चव्हाण यांचे मृत्युनंतर अर्जदारांना शैक्षणिक कामासाठी ते मयताचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्राची गरज असल्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

5. अर्जदार यांनी या अर्जासोबत दस्तऐवज यादी निशाणी क्र.3 नुसार मयत काशिनाथ सोभा चव्हाण यांचे मृत्यु दाखल्याची मुळ प्रत निशाणी क्र.12 वर दाखल केलेली आहे. मृत्यु दाखल्यावरून मयत काशिनाथ सोभा चव्हाण यांचा मृत्यु दिनांक 19/03/2021 रोजी मौजे. वडगांव नालबंदी, ता.भडगांव येथे झाल्याचे दिसुन येते. तसेच अर्जदार यांनी त्यांच्या आधारकार्डच्या पडताळीत प्रती दाखल केलेल्या आहेत.

6. अर्जातील कथनास व विनंतीस आक्षेप आहे की नाही हे पडताळुन पाहणेकरीता

अर्जातील मजकुराची जाहीर नोटीस स्थानिक वृत्तपत्र दैनिक 'लोकशाही' मध्ये दिनांक 06 ⁄ 12 ⁄ 2022 रोजी प्रसिध्द केली गेली. सदरचे प्रगटन प्रसिध्द झा—यापासुन ते हा आदेश होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीचा विरोध वा आक्षेप या न्यायालयास प्राप्त झालेला नाही.

7. अर्जदार क्र.1 महादु काशिनाथ चव्हाण यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. 11 वर दाखल केले व पुरशीस निशाणी क्र.14 अन्वये त्यांचा पुरावा बंद केला आहे. अर्जदार यांनी त्यांचे पुराव्याच्या शपथपत्रात मुळ अर्जातील त्यांच्या कथनांची पुर्नआवृत्ती केली आहे. त्यात त्यांनी असे कथन केले की, त्यांचे वडिलांचा मृत्यु दिनांक 19 ⁄ 03 ⁄ 2021 रोजी मौजे. वडगांव नालबंदी, ता.भडगांव येथे झालेला आहे. अर्जातील कथन व शपथपत्रातील पुरावा यास अर्जदारांनी दाखल केलेल्या मृत्यु प्रमाणपत्राच्या आधारे मृतकाच्या मृत्युची पुष्टी होते. सदरच्या वरील दाखल उपलब्ध सर्व कागदपत्रांवरून, कथनांवरुन अर्जदार क्र.1 व 2 हे मयत काशिनाथ सोभा चव्हाण यांचे कायदेशिर वारस असल्याचे दिसुन येते. म्हणुन अर्जदार क्र.1 व 2 यांना मयताचे वारस म्हणुन घोषित करण्यात येते.

8. तेव्हा अर्जातील कथन, तोडी व लेखी पुरावा इत्यादींचा विचार करता हे सिध्द होते की, अर्जदार क्र. 1 व 2 हे मयताच्या पश्चात कायदेशिर वारस आहेत. त्यांच्या शिवाय इतर कोणीही वारस नाही. म्हणुन सदर पुरावा ग्राहय धरणे योग्य होईल. सबब, असा निष्कर्ष काढण्यात येतो की, अर्जदार क्र. 1 व 2 हे मयताचे ''वारसाचे प्रमाणपत्र'' मिळविण्यास पात्र आहेत. करीता, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

1. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.
2. अर्जदार क्र.1 महादु काशिनाथ चव्हाण, अर्जदार क्र.2 जगदीश काशिनाथ चव्हाण, हे मयत काशिनाथ सोभा चव्हाण यांचे (Formally Recognized Heirs) औपचारीक ओळख दर्शविण्यासाठी वारस असून त्यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

सही ⁄ —

(श्रीमती.एस.एस.चव्हाण)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भडगांव

दिनांक : 19 ⁄ 01 ⁄ 2023